पुढारी | शनिवार
२७ सप्टेंबर २०१४

# समाजसेवेतून व्यक्तिमत्त्व विकास होतो : डॉ. प्रा. कोतवाल

## दोडामार्ग महाविद्यालयात एनएसएस स्थापन दिन कार्यक्रम

**दोडामार्ग : वार्ताहर**

सामाजिकसेवाहीनिरपेक्षभावनेने केली पाहिजे. समाजाने मला काय दिले यापेक्षा समाजाला मी काय दिले याचा विचार केला पाहिजे. सामाजिक सेवा करताना व्यक्तिगत कौशल्य विकसीत होतेच पण व्यक्तिमत्त्व विकासही साधला जातो. म्हणूनच समाजसेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. ज्यांच्याकडे सुंदर विचार असतात त्यांच्याकडे सर्व काही असते, म्हणून सतत चांगल्या विचारांचे बीजारोपण केले पाहिजे, असे विचार राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक व कणकवली महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. के.एम. कोतवाल यांनी व्यक्त केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. या समारंभात प्रमुख अतिथी या नात्याने ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. यु. देरेकर, प्रा. आर. ए. मोरे व अन्य प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील म्हणाले, समाजसेवेतून व्यक्तिमत्व विकास व व्यक्तिमत्त्व विकासातून नेतृत्वगुणाबरोबरच देश विकासही घडून येतो. थोरामोठ्यांचरित्रे वाचली तर निश्चितपणे भव्य दिव्य करण्याची अंत:प्रेरणा मिळू शकते. प्रास्ताविक डॉ. एस. यु.देरेकर, सूत्रसंचालन सेवा योजनेचे विद्यार्थी प्रमुख अनिल गावडे यांनी केले. आभार राजेश नाईक यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या जिल्हा समन्वयकपदी नियुक्ती झाल्याबद्दलही प्रा. डॉ. कोतवाल यांचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले.